आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१४  सप्टेंबर २०२६ -  सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यात सर्वत्र गणरायाचं उत्साहात आगमन / गणेशोत्सव पारंपरिक आणि पर्यावरणस्नेही पद्धतीनं साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- बहुभाषिक संस्कृती असलेल्या महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं सामावून घेतलं असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयकडून एफआयआर दाखल

- सेट परीक्षा आता २५ ऑक्टोबरला होणार

**आणि**

- माजी राज्यमंत्री मदन बाफना यांचं निधन

<><><><><>

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच गणेशचतुर्थी. १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज झाला.

मुंबईसह राज्यात सर्वत्र घरोघरी गणेशमूर्तींची स्थापना झाली. आजच हरतालिका तृतीया असल्यानं सकाळी घरोघरी हरतालिकेच्या मूर्तींची स्थापना आणि पूजा करण्यात आली. मुंबईत सुमारे सव्वा लाख घरगुती आणि दहा हजार सार्वजनिक गणेशमूर्तींची भक्तिभावानं प्रतिष्ठापना झाली असून, सर्वत्र मंगलमय वातावरण आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, आणि उपमुख्यमंत्री एकमाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन, तसंच वांद्रे इथं सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या मंडळाच्या सार्वजनिक गणेशमूर्तीचं दर्शन घेतलं.

यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणस्नेही साहित्यापासून बनवलेल्या मूर्ती आणि सजावटीला पसंती मिळत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मोठमोठ्या मूर्ती आधीच मंडपात विराजमान झाल्या असून आता दर्शनासाठी रांगा लागू लागल्या आहेत. श्रींच्या आगमनासाठी यंदा ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीनं पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिल्याचं दिसतं. गणेशोत्सवानिमित्त विविध कल्याणकारी उपक्रम राबवले जात असून

सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. पुण्यात मानाच्या ५ गणपतींसह विविध गणेश मंडळांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना झाली. पुण्यातही पारंपरिक वाद्यांवर भर दिल्याचं दिसतं. गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या गर्दीचा विचार करुन ठिकठिकाणी वाहतुकीचं नियोजन केलं आहे. पोलीस बंदोबस्तही ठेवला आहे.

गणेश चतुर्थीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीगणेश सर्वांच्या जीवनात सुख, शांती, उत्तम आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवोत, अशी प्रार्थना त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात केली आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनीही गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. गणेशोत्सव नवी ऊर्जा आणि चैतन्य घेऊन येतो, श्री गणेशाच्या आशीर्वादाने देशाची प्रगतीच्या मार्गावर अखंड वाटचाल होत राहो, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

**नागपुरात** ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ अभियानांतर्गत १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान आरोग्य आणि रक्तदान शिबिरं घेतली जाणार आहेत. ध्वनिप्रदूषणाविरोधात मूक मोर्चाही काढण्यात आला. **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी** यांनी निवासस्थानी गणेशाची प्राणप्रतिष्ठा करून देशाच्या सुख-समृद्धीसह भारताला विश्वगुरू बनवण्याची प्रार्थना केली.

**नाशिक** शहरासह जिल्ह्यात गणरायाचं उत्साहात स्वागत झालं. शहरात सुमारे दीड हजार गणेश मंडळं असून, शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य दिलं जात आहे. जिल्ह्यात ७५७ गावांनी ‘एक गाव, एक गणपती’ संकल्पना स्वीकारली आहे.

**रत्नागिरीत** १ लाख ६९ हजार ५३८ घरगुती आणि १२७ सार्वजनिक गणपती विराजमान झाले आहेत. कर्ला-आंबेशेतमधल्या सुमारे १२५ गणपतींची सामूहिक मिरवणूक यंदा ४१व्या वर्षीही लेझीम आणि ढोलपथकासह निघाली.

**सिंधुदुर्गा**त ७४ हजार ३५१ घरगुती आणि ३२ सार्वजनिक गणपतींची स्थापना झाली. पारंपरिक लाकडी माटवीत फळाफुलांची सजावट करण्याची प्रथा कायम असून, चाकरमानी मोठ्या संख्येनं गावी दाखल झाले आहेत.

**चंद्रपूर**मधे १५ हजार ८८५ गणपतींची स्थापना झाली असून, साडेतीन हजार सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत.

**नांदेड** शहरासह जिल्ह्यात श्रीगणरायांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं **बीड**मध्ये २९२ गावांनी, तर **धुळ्या**त ३६ गावांनी ‘एक गाव, एक गणपती’ उपक्रम स्वीकारला आहे.

**अकोला, अमरावती, वाशिम आणि यवतमाळ** जिल्ह्यांतही गणेशमूर्तींच्या प्रतिष्ठापनेसह बाजारपेठा आणि सार्वजनिक मंडळांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. **अमरावतीत** मातीच्या गणेशमूर्तीसोबत रोप आणि कुंडी देऊन पर्यावरणसंवर्धनाचा संदेश दिला जात आहे. **लातूर**मध्ये ढोल-ताशांच्या गजरात बाप्पाचं स्वागत झालं.

**<><><><><>**

गणेशोत्सव पारंपरिक आणि पर्यावरणस्नेही पद्धतीने साजरा करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. मुंबईत वर्षा निवासस्थानी श्रीगणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केल्यानंतर आज ते वार्ताहरांशी बोलत होते. २०२९ पर्यंत समान नागरी कायदा भाजपाशासित राज्यांमधे लागू करण्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केली, त्यासंदर्भात फडणवीस म्हणाले की, राज्यशासनाने याकरता ७ सदस्यीय समिती नेमली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विधेयक विधीमंडळात सादर केलं जाणार आहे.

मराठा आरक्षणासंदर्भात आंदोलनकर्त्यांच्या बहुतेक सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत, अशा परिस्थितीत मनोज जरांगे यांनी मुंबईत गणेशोत्सव काळात आंदोलन करणं उचित नाही, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्र्यांनी दिली.

- **- होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे १५ सप्टेंबरला एकटेच मुंबईला येणार असून त्यांनी इतर मराठा बांधवांना मुंबईकडे न येण्याचं आवाहन केलं आहे. सणावारांच्या कालावधीत दंगल घडवून मराठा समाजाला गालबोट लावण्याच्या प्रयत्न केला जाणार असल्याचं मत जरांगे यांनी सूत्रांकडे व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राची संस्कृती ही बहुभाषिक असून महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं आपल्यात सामावून घेतलं आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी मुंबईत वाशी इथं हिंदी दिवस २०२६ आणि सहावं अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं

उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. महाराष्ट्राइतका बहुभाषिक प्रदेश इतरत्र कुठंही नाही, असं शहा म्हणाले.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

राजकीय मतभेद सोडून भारतीय भाषांना चालना देण्यावर भर द्यायचं आवाहन शहा केलं. या सर्व भाषांचा स्वर वेगवेगळा असला, तरी गीत एकच आहे, भारतीय भाषांना विज्ञानाची, साहित्याची भाषा करायचं आहे, एकमेकींशी जोडायचं आहे, असं त्यांनी सांगितलं. राजभाषा हिंदी ही देशातल्या सर्व भाषांशी जोडलेली आहे, असं मत त्यांनी मांडलं.

आपण आपल्या भाषांचा सन्मान केला नाही, तर जगही करणार नाही, त्यामुळे राजभाषा, निजभाषा, मातृभाषेसह देशातल्या सर्व भाषांचा सन्मान करणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं.

केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी शहा यांनी राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कारांचं वितरण केलं. तसंच विविध पुस्तकं आणि ॲप्सचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते यावेळी झालं.

**<><><><>**

दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं एफआयआर दाखल करून घेतला आहे. दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर होती आणि ८ जून २०२० रोजी इमारतीच्या १२व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एफआयआर दाखल करायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले होते. त्यानुसार, हा एफआयआर काल दाखल झाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, पोलीस अधिकारी सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतर अनेक जणांचा उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

**<><><><>**

प्राध्यापक भरतीसाठी आवश्यक असलेली सेट म्हणजे महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा आता २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट

विभागानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. यापूर्वी ही परीक्षा २७ सप्टेंबर रोजी होणार होती.

**<><><><><>**

माजी राज्यमंत्री मदन बाफना यांचं आज अल्पशा आजारानं पुण्यात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. १९८५ मध्ये ते पहिल्यांदा मावळ मधून आमदार म्हणून निवडून आले होते. नंतर त्यांनी महसूल, नगरविकास, अर्थ तसंच विधी आणि न्याय राज्यमंत्री पदाचा कार्यभार सांभाळला होता. सुरुवातीला काँग्रेस आणि नंतर अखेरपर्यंत ते शरद पवारांच्यासोबत कार्यरत राहिले.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली.

//<><><><><>//